जा.क्र./पोउआ/वाह/९१९६ /१८

**प्रेसनोट** पुणे दिनांक -०५ /०९/२०१८

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार व्राहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी तेजस्वी सातपुते, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, बाजीराव रोड, टिळक रोड, शिवाजी रोड, कुमठेकर रोड, लक्ष्मी रोड या रस्त्यांवर मालाची चढ-उतार करण्यास प्रायोगिक तत्वावर सकाळी ०७.०० ते रात्री २२.०० वा. पर्यंतचे कालावधीमध्ये मनाई आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. ( या रस्त्यांवर पुर्वीचे अवजड वाहने (लक्झरी बससह) व अन्य वाहने यांचेसाठी असलेले निर्बंध कायम राहुन हे अतिरीक्त निर्बंध असतील.)

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - ०५/०९/२०१८ ते दिनांक – २४/०९/२०१८ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचन व हरकती विचार करुन अंतिम आदेश काढण्यात येतील.

**पुणे शहरातील बाजीराव रोड, टिळक रोड, शिवाजी रोड, कुमठेकर रोड, लक्ष्मी रोड या रस्त्यांवर वाहने थांबवुन मालाची चढ-उतार करण्यास प्रायोगिक तत्वावर सकाळी ०७.०० ते रात्री २२.०० वा. पर्यंतचे कालावधीमध्ये मनाई आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.**

सही/-
(तेजस्वी सातपुते)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - १

प्रत :-

१) पोलीस निरिक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

२) सर्व संबंधित सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर

३) सर्व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक विभाग, पुणे शहर
**२/-सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टसह दोन दिवसात सादर करावी.**

**५) पोलीस हवालदार गायकवाड, ब. नं. २७४९, वाहतुक शाखा, पुणे शहर.**
२/-सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

**६) पोलीस हवालदार घाडगे ब. नं. ५३१४, वाहतुक शाखा, पुणे शहर.**
२/- सदर प्रेसनोट ही सर्व संबंधीत वर्तमानपत्राचे प्रतिनिधीच्या मेलवर पाठवावी, तसेच सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर अपलोड करावी.